सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००४१६५**

**अपिलार्थी श्री. संजय सिताराम कु-हाडे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (का.क्र.११)**
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महानिरिक्षक यांचे उपसहायक (वि.चौ)**
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित(अपिलार्थींची नोटीस पोस्टाने परत)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०७.२०२१ | ०२.०९.२०२१ | ०९.०९.२०२१ | १३.१०.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०३.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०२.०९.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १३.१०.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २६.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार पोलीस कॉन्स्टेबल पदापासून ते पोलीस निरिक्षक पदापर्यंतच्या पदांवरील पोलीस अंमलदारांविरुध्द मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपीले) नियम, १९५६ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करणेसंदर्भातील माहिती विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०९.२०२१ नुसार अपिलार्थींना मुद्देनिहाय उत्तर दिले. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०९.०९.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१०.२०२१ च्या आदेशामध्ये मुद्देनिहाय विवेचनासह अपील निकाली काढलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना सुचना दिल्या की, कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली दि. १२.०९.२०१८ रोजीची माहिती अपिलार्थींना निशुल्क सत्वर उपलब्ध करुन देण्यात यावी.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दि. २७.०६.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निवेदन सादर करुन नमुद केले की, त्यांच्या आदेशानंतर अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

27-6-2024

**मुंबई**
**दिनांक : २७.०६.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**